दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय**

www.esuryodaylive.com

Email : suryodaykokan.123@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

कोकण || वर्ष २ रे || अंक २२९ || रविवार ०४ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# गद्दारांना ठेचून काढायचंच; शेकाप सरचिटणीस जयंत पाटील कडाडले

अलिबाग प्रतिनिधी

राजेश बाष्टे:

आजपर्यंत शेकापने अनेक कार्यकर्त्यांना मोठे केले. मोठ मोठ्या पदांची जबाबदारी विश्वासाने दिली. आज तेच कार्यकर्ते शेकाप लहान पक्ष आहे, असं म्हणत आहेत. भाजपच्या पुढे नमतं घ्या असं सांगत पक्ष सोडून,

तत्त्व सोडून दुसर्या पक्षात प्रवेश करत आहेत, अशांना ठेचून काढू, अशी संतप्त प्रतिक्रिया शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केले. पंढरपूर येथे शेकापचे १९ वे अधिवेशन सुरु असून, या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी जयंत पाटील यांनी आपल्या तडाखेबंद, जोषपूर्ण भाषणातून उपस्थित कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा दिली.

पुढील काळ शेकापक्षासाठी पोषक असणार आहे. आपल्याला पुन्हा खंबीरपणे उभे राहण्यासाठी कार्यकर्त्यांनी २४ तास पक्षाचे काम करायचे आहे,

अशी भावनिक सादही जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना घातली. उद्याची पहाट ही आपलीच असणार आहे. आपल्याला उत्तुंग भरारी घेऊन शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा डौलाने फडकवायचा आहे, असा विश्वासही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस कॉ. दिपांकर भट्टाचार्य, भारतीय कम्युनिष्ट पक्ष सचिव कॉ. डॉ. उदय नारकर, कॉ. ॲड. सुभाष लांडे, लाल निशाणी पक्ष जनरल सेक्रेटरी कॉ. भीमराव बनसोड, सत्यशोधक कम्युनिष्ट पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते कॉ. किशोर ढमाले, समाजवादी पार्टीचे सरचिटणीस प्रताप होगाडे, माजी आ. संपतबापू पवार पाटील, माजी आ. पंडित पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, प्राध्यापक एस.व्ही.

जाधव, शेकाप कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, स्वागताध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रीतम म्हात्रे, रायगड बाजार चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, जि.प. माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, माजी सदस्या भावना पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक,

माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, वृषाली ठोसर, संजना कीर, अनिल चोपडा, वैशाली पाटील, प्रिया वेलणकर, जि.प. माजी सदस्य संजय पाटील, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा चिटणीस, तालुका चिटणीस, शेकापच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण मंडळी उपस्थित होते.






## रत्नागिरीत बनावट नोटा छापणरे रॅकेट........ प्रिटिंग प्रेस मालकाला अटक

रत्नागिरी : रत्नागिरीतील प्रसाद राणे प्रिंटिंग प्रेसमधूनच बनावट नोटांची छपाई सुरू असल्याची धक्कादायक माहिती गुन्हे शाखेच्या तपासात समोर आली. या प्रकरणातील प्रिंटिंग प्रेसचा मालक प्रसाद राणेला गुन्हे शाखेने अटक केली. तसेच एका पतसंस्थेचा माजी शाखा व्यवस्थापक अमित कासार याने पतसंस्थेच्या माध्यमातून या नोटांचा वापर केला आहे का? याबाबतही गुन्हे शाखा तपास करत आहे. गुन्हे शाखेने यापूर्वी शहानवाज शिरलकर (५०), राजेंद्र खेतले (४३), संदीप निवलकर (४०) आणि ऋषिकेश निवलकर (२६) यांना अटक केली होती. यांच्या चौकशीतून अमित कासारचे नाव समोर आले. ॾकासारच्या चौकशीतून एका वकिलालाही अटक केली आहे. त्यापाठोपाठ प्रसाद राणेला रत्नागिरीतून अटक केली. रत्नागिरीमध्ये राणेची प्रिंटिंग प्रेस आहे. तेथूनच तो बनावट नोटांची छपाई करत असल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली. गुन्हे शाखेच्या कक्ष १० ने बनावट नोटप्रकरणी अटकसत्र सुरू केल्यानंतर त्याने प्रिंटिंग मशीन घरापासून काही अंतरावर असलेल्या झाडाझुडपात फेकून दिली. गुन्हे शाखेने ही मशीन जप्त केली आहे. हुबेहूब वाटणाऱ्या नोटा मशीन तपासणाऱ्या मशीनमध्येसुद्धा ओळखल्या जात नव्हत्या. त्यामुळे आरोपींनी आतापर्यंत अनेक नोटा विविध बाजारात चलनात आणल्याचे समोर आले.२५ हजारांच्या बनावट नोटांवर १० ते १५ हजारांचे कमिशन देत या नोटा चलनात आणल्या जात होत्या. यामध्ये कासार हा पतसंस्थेचा शाखा व्यवस्थापक असल्याने त्याला हाताशी घेत हे रॅकेट सुरू होते. कासारची ३१ जुलैला न्यायालयीन कोठडी रवानगी केली आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून काही उलाढाल केली आहे का? याबाबतही राणेकडे चौकशी सुरू आहे. त्याला ५ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. गुन्हे शाखेच्या कक्ष १० चे प्रभारी वरिष्ठ पोलिस निरीक्षक दीपक सावंत, पोलिस निरीक्षक मनोज सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी गणेश तोडकर, धनराज चौधरी, पोलिस अंमलदार चिकने आणि डफळे यांनी ही कारवाई केली आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून चिपळूण, रत्नागिरी आणि आसपासच्या परिसरात सतत पूर परिस्थिती असतानाही मुंबई-रत्नागिरी-चिपळूण असा वारंवार प्रवास करून गुन्हे शाखेने आरोपींचा शोध घेत बेड्या ठोकल्या आहे.

## जालगांव ग्रामस्थांनी वीज महावितरण विरोधात आमदारांना घातले साकडे

दापोली (प्रशांत परांजपे)

अनियमीत विजपुरवठा आणि वळणे मंजुर सबस्टेशन निधी मिळणे बाबत जालगांव ब्राह्मणवाडी ग्रामस्थांकडून आमदार योगेशदादा कदम यांना निवेदन देण्यात आले.

जालगांव ब्राह्मणवाडी हे तालुक्यातील विस्तृत परिसर आणि मोठी लोकसंख्या असलेला गांव या गावात गेली अनेक दिवस विजेचा खेळखंडोबा सुरूच असुन व्यवसायीक आणि सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत यावर अनेक वेळा बैठका,ठीय्या आंदोलन ,प्रत्यक्ष भेटी होऊन देखील म्हणावा तसा बदल दिसत नव्हता. याच कारणाने ग्रामस्थांकडून आमदार योगेशदादा कदम यांची भेट मागितली गेली होती त्यानुसार काल दि २ऑगस्ट रोजी आमदार महोदयांनी चर्चेसाठी ग्रामस्थांना निमंत्रित केल आणि त्यावेळी संबधीत खात्याच्या प्रमुखांना उपस्थित राहण्याचे आदेश दिले या सभेत आमदार महोदयांनी ग्रामस्थाकडुन आलेल्या निवेदनावर सखोल चर्चा घडवुन आणली यामध्ये विज वाहीन्यांना सुरक्षा गार्ड बसवणे,कर्मचाऱ्यांकडुन ग्रामस्याना उद्धट उत्तरे,फोन न उचलणे, गावातील मागणी असलेल्या डीपी बसवणे,ग्रामसभाना खात्याचा प्रतिनीधी उपस्थित न रहाणे,गावातील विजेसंबधी सद्य स्थितीतील माहीती असलेल्या अनुभवी वायरमनची नेमणुक करणे,आणि महत्वाच्या वळणे एमआयडिसी येथील मंजुर सबस्टेशनला लवकारात लवकर निधी मंजुर करण्यासाठी आपल्या स्तरावर प्रयत्न करावा अशा अनेक निवेदनात मांडलेल्या विषयांवर विस्तृत चर्चा झाली. त्यातील जे विषय तातडीने सुटण्यासारखे आहेत त्याची कार्यवाही संबधीत खात्याने पुढील आठ दिवसानी होणा-या आढावा सभेपुर्वी पुर्ण करून मला त्याचा अहवाल द्यावा अशा सक्त सुचना आमदार महोदयानी उपस्थित अधिकाऱ्याना दिल्या. सबस्टेशन लवकर होण्या कामी मी जातीने लक्ष घालीन असे सुतोवाच त्यांनी या प्रसंगी केले दिवाळीपूर्वी सबस्टेशन निधी मंजुरीची भेट जालगांव ब्राम्हणवाडी तसेच परिसरातील जनतेला आपण देऊन या अनियमीत विजपुरवठ्याला पुर्णविराम द्यावा अशी इच्छा ग्रामस्थाकडुन व्यक्त करण्यात आली. या बैठकीला मुख्य अभियंता खेड प्रमोद बारगडे साहेब ,उपअभियंता कुकडे साहेब ,विभागाचे जेई श्री ओगले साहेब,जालगांव गावसई अद्यक्ष अशोक जालगांवकर,जालगांव गावसई उपाध्यक्ष रमेश कडु,माजी उपसभापती मनोज भांबीड,माजी उपसरपंच विलास जालगांवकर,शिरीष देसाई,ग्रा.सदस्य मयुर मोहीते ,ब्राम्हणवाडी जेष्ठ सदस्य सुरेश रेवाळे,माजी पोलीस पाटील देवेंद्र शिन्दे ,गजानन कांबळे,श्रीरामनगर वाडी अध्यक्ष योगेश साटम,अमोल जाधव ,महावितरण खात्याचे अन्य विभागातील अधिकारी कर्मचारी या सभेला उपस्थित होते




## शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या हस्ते उद्घाटन

श्रीवर्धन राजू रिकामे;

श्रीवर्धन तालुका शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी बोर्ली पंचतन येथील दिवेआगर रोड वरील उंड्रे हायस्कूल जवळ संपन्न झाला, यावेळी श्रीवर्धन तालुक्यात शिवसेना वाढीसाठी मेहनत करा, पक्षवाढीसाठी कोणी आडवा येत असेल तर शिंगावर घ्या हीच आपल्याला बाळासाहेबांची शिकवण असल्याचे शिवसेना दक्षिण रायगडचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले.ॾउद्घाटन कार्यक्रमात श्रीवर्धन शिवसेना कार्यकर्ते यांच्याकडून भविष्यात येऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकांसह श्रीवर्धन विधानसभा मतदार संघ शिवसेनेकडे राहावा, शिवसेनेमार्फत धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढविली जावी, अनेक विकासकामे मार्गी लागावी या मागण्यांनी जोर धरला होता यावर आपण तुम्ही सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत एकनाथजी शिंदे यांची वेळ मागणार असून श्रीवर्धन विधानसभा मतदार संघ पुन्हा एकदा शिवसेनेचा बालेकील्ला करण्यासाठी आजपासून कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे काम जोमाने करा. एक बूथ पन्नास युथ संकल्पना राबवून जास्तीत जास्त तरूण मतदारांना पक्षाकडे आकर्षित करा. शिवसेना मुख्य नेते आदरणीय एकनाथजी शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारकडून आणलेल्या विविध योजना घरोघरी पोहोचवून पक्ष वाढीसाठी कसा लाभ घेता येईल यासाठी प्रयत्न करा. आपली ताकद आपल्यालाच वाढवायला लागणार आहे. ताकद वाढली की आपली दखल वरिष्टांना घ्यावीच लागेल परंतु त्यासाठी आगोदर आपण सर्वांनीच कामाला लागले पाहीजे. दुर्दैवाने मित्र पक्षाकडून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सरकारकडून घेतलेल्या निर्णयाच्या जाहीरातीत देखील दुजाभाव होतो

त्यासाठी देखील आपण वरिष्टांकडे तक्रार करणार असून मित्र पक्षाकडून पक्षाच्या कार्यकर्त्यांना योग्य वागणूक, मान सन्मान मिळणार नसेल तर त्यासाठी देखील आपण एकत्र येऊन निर्णय घेऊयात असा इशारा देखील शिवसेना दक्षिण रायगडचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी शेवटी दिला.ॾयावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, श्रीवर्धन विधानसभा संपर्क प्रमुख सचिन पाटेकर, तालुकाप्रमुथ सुरेश मिरगळ, म्हसळा तालुकाप्रमुख प्रसाद बोर्ले, रोहा तालुका प्रमुख मनोज शिंदे ,रफिक जहागिरदार, ऐश्वर्या जाधव, सागर इंगळे, शब्बीर उंन्ड्रे, ओमकार शेलार, सावन तवसाळकर, अजय चव्हाण, सुप्रिया करदेकर, देविदास कावळे, प्रविण दर्गे, राजकीरण खोपटकर, शकूरभाई हुसेनी यांच्यासह शिवसेना श्रीवर्धन तालुका शिवसेना पदाधिकारी व शिव सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



